वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे कार्यालय

विषय :- 'लेदर बॅग्ज व रेनकोट' खरेदी करणेकरीता दरपत्रक मागविण्याबाबत.

जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम या न्यायिक जिल्ह्यातील आदेशीका वाहक यांना समन्स, वॉरंट, नोटीस इत्यादी बजावण्याकरीता वादी/प्रतिवादी यांच्याकडे जावे लागते. सदर कागदपत्रे गोपनीय स्वरूपाची असल्याने ती सुरक्षिततेने हाताळणे आवश्यक असते. त्यामुळे पावसाळ्यात कार्यालयीन अभिलेख खराब होउ नये म्हणुन त्यांना महत्वाचे अभिलेख ठेवण्याकरीता चार चैन असलेल्या कप्यांची एकुण ३७ लेदर/रेगझीन बॅग्ज व ३७ झील या कंपनीचे (शर्ट, पॅन्ट व टोपी या प्रकाराचे) रेनकोट स्थानिक बाजारपेठेतुन खरेदी करणेकरीता खालील अटी व शर्तींवर दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

१. खरेदी केलेल्या वस्तुचा पूरवठा, आदेश दिल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत करणे बंधनकारक राहील.
२. खरेदी करण्यात आलेल्या वस्तूंचा पूरवठा हा जिल्हा न्यायालय, वाशिम येथे करणे बंधनकारक राहील.
३. पुरवठा करण्यात आलेल्या वस्तुंमध्ये काही त्रुटी आढळल्यास सदरच्या त्रुटी असलेली/असलेल्या वस्तू तात्काळ बदलवून देणे अनिवार्य राहील.
५. खरेदी केलेल्या वस्तुंचे देयकाचे प्रदान हे अदाता नोंदणी पदधतीद्वारे सरळ अदात्याचे बॅक खात्यात जमा करण्यात येईल.

दरपत्रक धारकाने वरीलप्रमाणे लेदर बॅग्ज व रेनकोट स्थानिक बाजारपेठेतुन खरेदी करणेकरीता आपले दरपत्रक सर्व कर, किंमती व अटीसह दिनांक ३०/०६/२०२५ रोजी किंवा तत्पुर्वी वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे नांवे या कार्यालयास बंद लिफाफयामध्ये सादर करावे. तसेच बंद लिफाफयावर **"लेदर बॅग्ज व रेनकोट'** खेरदी असे ठळक अक्षरात नमुद करावे.

तसेच प्राप्त झालेले दरपत्रके कोणतेही कारण न दाखविता नामंजूर करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांना राहील.

आदेशावरून,

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, वाशिम.

दिनांक :२१/०६/२०२५